दैनिक महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com | संपादक : अजय भांगे | https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | रविवार दि.१४ डिसेंबर २०२५ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक ११२ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Sunday 14 December 2025 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 112 | Pages 4 | Rate 4 Rs

# आशियातील सर्वात मोठे ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर महाराष्ट्रात उभारण्यात येणार-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस


## एमएमआरडीए व ब्रुकफिल्ड कंपनी यांच्या संयुक्त नेतृत्वात प्रकल्प उभारणार

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील प्रतिभा, पायाभूत सुविधा आणि व्यवसाय-अनुकूल वातावरण या तीन घटकांमुळे महाराष्ट्र ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटरसाठी अग्रगण्य ठरत आहे. यावर्षी जाहीर केलेले नवीन ऋछउ धोरण राज्यात उच्च मूल्याच्या, कौशल्याधारित रोजगारनिर्मितीस प्रोत्साहन देईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सांगितले.

ब्रुकफिल्ड कंपनीने मुंबईतील पवई येथे ६ एकर जागेवर २० लाख चौरस फूट भाडेतत्वावरील बांधकाम असलेला भव्य प्रकल्प उभारण्याची घोषणा केली आहे. या अंतर्गत बहुराष्ट्रीय बँकेचे आशियातील सर्वात मोठे ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर (GCC) स्थापन केले जाणार आहे. हा करार २० वर्षांच्या कालावधीसाठी करण्यात आला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, या मोठ्या प्रकल्पांमुळे महाराष्ट्राच्या प्रगतीबाबत जागतिक स्तरावर विश्वास दृढ झाला आहे. आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या





भविष्यातील गरजा पूर्ण करण्याबरोबरच, स्थिर आणि सक्षम वातावरण पुरवण्यास राज्य शासन तत्पर आहे. सदर प्रकल्प २०२९ पर्यंत पूर्ण होणार असून, यामध्ये १ अब्ज डॉलर्सपेक्षा अधिक गुंतवणूक अपेक्षित आहे तसेच ३०,००० हून अधिक रोजगारनिर्मिती होणार आहे. हा प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) व ब्रुकफिल्ड यांच्या नेतृत्वाखाली भागीदार बी. एस. शर्मा यांच्या सहकार्याने राबविण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. मुख्यमंत्री म्हणाले की, ही उभारणी महाराष्ट्रातील गुंतवणूकदार-अनुकूल वातावरणाबाबत जागतिक कंपन्यांचा वाढता विश्वास अधोरेखित करणारी आहे. प्रकल्पासाठी १०० टक्के हरित उर्जेचा वापर करण्याचे उद्दिष्ट असून इमारत बाजारातील सर्वोत्तम शाश्वत बांधकाम मानकांनुसार उभारली जाणार आहे. यामुळे मुंबईचे ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर हब म्हणूनचे स्थान आणखी मजबूत होणार आहे. २०२४ मध्ये ब्रुकफिल्डने पुण्यात एका मोठ्या वित्तीय सेवा कंपनीसाठी 'बिल्ड-टू-सूट' टॉवर उभारला होता. याच वर्षी MMRDA सोबत १२ अब्ज डॉलर्सच्या गुंतवणुकीचा सामंजस्य करार करण्यात आला. जून २०२५ मध्ये कंपनीने बांद्रा-कुर्ला संकुलात २.१ एकर जागा खरेदी केली आहे.

ब्रुकफिल्डचे वरिष्ठ गुंतवणूक अधिकारी अंकुर गुप्ता म्हणाले , आशिया खंडातील कार्यालय विकास क्षेत्रात नवा मापदंड ठरेल असा हा आयकॉनिक प्रकल्प आम्ही उभारत आहोत. मुंबईत करण्यात आलेली गुंतवणूक आता ४ अब्ज डॉलर्सपेक्षा अधिक झाली आहे. उच्च दर्जाची, शाश्वत आणि आधुनिक कार्यस्थळे निर्माण करण्यासाठी ब्रुकफिल्ड कटिबद्ध आहे.

ब्रुकफिल्ड ही भारतातील सर्वात मोठ्या कार्यालयीन मालक आणि ऑपरेटर कंपन्यांपैकी एक असून देशातील सात शहरांमध्ये सुमारे ५५ दशलक्ष चौरस फूट क्षेत्राचे व्यवस्थापन करते. उच्च दर्जाच्या, ग्रेड- - प्रकल्पांची विकास व संचालन क्षमता कंपनीने सातत्याने सिद्ध केली आहे. पवईतील प्रस्तावित प्रकल्पाला उत्कृष्ट कनेक्टिव्हिटी, सामाजिक सुविधा व मोठ्या प्रमाणातील कुशल मनुष्यबळाचा लाभ मिळणार आहे.

# भैय्यासाहेब आंबेडकरांच्या त्याग आणि समर्पणाने भारतीय बौद्धांना दिशा मिळाली-बौद्धचार्य अतुल वैराट

दैनिक वादळ वार्ता
**परभणी । प्रतिनिधी**

येथील त्रिरत्न बुद्ध विहार, तुळजाभवानी नगर वांगी रोड या ठिकाणी सूर्यपुत्र भैय्यासाहेब आंबेडकर यांच्या ११३ व्या जयंतीनिमित्ताने वैचारिक अभिवादन सोहळा संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यु आर शिवभगत हे होते तर प्रमुख वक्ते म्हणून बौद्धाचार्य अतुल वैराट होते. प्रमुख उपस्थितीत पूज्य भंते धम्मपाल,भारतीय बौद्ध महासभा जिल्हाध्यक्ष एम एम भरणे, अशोकराव कांबळे,डी आय खेडकर, वी वी वाघमारे, आनंदा भेरजे, विश्वनाथ झोडपे,



बी पी धबाले, चंद्रकांत वावळे हे होते. यावेळी प्रमुख वक्ते अतुल वैराट यांनी प्रतिपादन केले की सूर्यपुत्र भैयासाहेब आंबेडकर यांनी भारतीय बौद्ध महासभेचे द्वितीय अध्यक्ष म्हणून भारतातील कानाकोपऱ्यात धम्माचा प्रचार प्रसार केला. त्यांनीच चैत्यभूमीची निर्मिती केली. बौद्ध संस्कार पाठ, स्वतंत्र बौद्ध विवाह कायदा, जनगणना नोंदणी, धम्मपरिषदा आणि भारतीय बौद्धांचे प्रतिनिधी म्हणून श्रीलंका, थायलंड, म्यानमार, दिल्ली व सारनाथ या ठिकाणी सहभाग घेतला. असे सांगितले. यावेळी भारतीय बौद्ध महासभा जिल्हा शाखा परभणीतील नवनिर्वाचित पदाधिकारी यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाची प्रस्तावना रोहिदास गायकवाड यांनी केली तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन एन बी पगारे यांनी केले. यावेळी त्रिरत्न महिला मंडळांनी वंदना घेतली यशस्वीतेसाठी जयंती उत्सव समितीचे पदाधिकारी आर एम भुजबळ, एम एम वैराट, वी बी सूर्यवंशी, एन एफ साबळे यांनी परिश्रम घेतले.

# रानडुकराने केला शेतकरी जखमी आजेगाव येथील घटना

दैनिक वादळ वार्ता
**सेनगाव । प्रतिनिधी**

सेनगाव तालुक्यातील आजेगाव येथील शेतकरी त्र्यंबक कचरू नरवाडे हे आपल्या शेतात गेले असता अचानक रान डुक्कर येऊन शेतकरी त्र्यंबक कचरू नरवाडे यांच्या मांडीला जावा घेऊन शेतकऱ्यांना जखमी केले दिनांक ८ डिसेंबर रोजी त्र्यंबक कचरू नरवाडे हे गट क्रमांक ४२८ मध्ये शेती कामानिमित्त गेले असता अचानक रानडुकराने येऊन त्यांच्यावर हल्ला करून त्यांना जखमी केले आजेगाव शेत शिवार व शिंदेफळ शिवारामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून आजेगाव येथील सरपंच महादेव काळे, पत्रकार केशव भालेराव, छावा तालुका अध्यक्ष किशोर



पाटील ,गजानन पारटकर हे वन विभागाला निवेदन देणार असल्याचे समजले आहे परंतु आजेगाव शेत शिवार व शिंदेफळ शेत शिवारामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे तरी रानडुकराचा बंदोबस्त करण्यात यावा अशी मागणी शेतकऱ्याकडून केली जात आहे,

# लग्नासाठी दोन लाखाची फसवणूक, वधू सह मावशीला न्यायालयीन कोठडी

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील युसूफवडगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कोद्री येथील नवरदेवाकडुन दोन लाख घेवून लग्न लागल्या नंतर तीन तासानंतरच पळून जाणाऱ्या नववधू सह तिच्या मावशीला केज न्यायालयासमोर हजर केले असता दोघींनाही १४ दिवस न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश केज न्यायालयाने दिले आहेत. दोन लाख रुपये घेवून लग्न लावल्यानंतर अवघ्या तीन तासानंतरच पळून जाताना नव वधू प्रीती शिवाजी राऊत हिला पोलिसानी ताब्यात घेवून केज न्यायालया समोर हजर केले आसता तीला १० तारखेपर्यंत ३ दिवस पोलीस




कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले होते.

**मावशी चाकण मध्ये जेरबंद..!**

दोन लाख रुपये घेवून फसवणूक केल्याचा गून्हा नोंद होताच तपासी अधिकारी पोलिस उप निरीक्षक भिमराव मांजरे, जमादार धनंजय कारले व एका महिला कर्मचाऱ्यांच्या पथकाने फसवणूक करणाऱ्या मुलीची मावशी असल्याचे सांगितल्या वरून माया सतीश राऊत या मावशी ला पुण्याच्या चाकण परिसरातून पोलिसांनी ताब्यात घेवून गुरूवारी दि.११ डिसेंबर नववधू प्रीती राऊत हिची पोलीस कोठडी संपल्यामुळे प्रीती राऊत व मावशी माया सतीश राऊत या दोघींना ही केज न्यायालयात हजर केले असता. दोघींनाही १४ दिवस न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश केज न्यायालयाने दिले आहेत. या प्रकरणातील आणखी २ आरोपी फरार आहेत. त्यांच्या तपासासाठी पथक तैनात केल्याची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिन्द्र शेंडगे यांनी प्रतिनिधीशी बोलताना दिली आहे.

# मंत्री सभागृहात मंत्री येत नसतील तर त्यांच्यावर बिबटे सोडा-सुधीर मुनगंटीवार

दैनिक वादळ वार्ता
**नागपूर । प्रतिनिधी**

या हिवाळी अधिवेशनात सभागृहात मंत्री हजर नव्हते त्यामुळे भाजप आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी महायुती सरकारच्या कारभारावर तीव्र शब्दांत ताशेरे ओढले. सभागृहात मंत्र्यांच्या अनुपस्थितीवरून ते चांगलेच संतापले. मंत्री सभागृहात येत नसतील तर त्यांच्यावर बिबटे सोडा, असे आक्रमक विधान करत त्यांनी मंत्र्यांच्या गैरहजेरीवर सरकारची खरडपट्टी काढली.

सभागृहात महत्वाच्या विषयावर जनतेच्या प्रश्नावर न्याय मिळण्यासाठी आमदार उपस्थित असताना मंत्री उपस्थित नसणे हे गंभीर असल्याचे असे मुनगंटीवार म्हणाले. याचबरोबर, मुनगंटीवारांनी चंद्रपूर जिल्ह्यातील घरकुल योजनेच्या निधीवरून सरकारला लक्ष्य केले. घरकुलांसाठी ९६ कोटी ३६ लाख ४२४०० रुपयांचा निधी आवश्यक असताना तो उपलब्ध नसल्याबद्दल त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. ज्या भारत मातेच्या लेकरांना डोकं ठेवायला जागा नाही, त्यांना ९६ कोटी मिळत नसतील, तर अशा अधिकाऱ्यांनी कोरड्या विहिरीमध्ये जीव द्यावा, असे संतापजनक विधान त्यांनी केले. मुंबईतील लोकांसाठी ११ लाख कोटी राज्य सरकारकडे उपलब्ध असताना गरीब लोकांसाठी निधी का नाही, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. यावर आमदार अतुल सावेंनी पुरवणी मागणीमध्ये घरकुल योजनेसाठी ३०० कोटी रुपये मंजूर झाल्याचे आणि चंद्रपूर जिल्ह्यासाठी १००% निधी तात्काळ दिला जाईल असे आश्वासन दिले. चंद्रपूरमधील घरकुले यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेतून काढून पंतप्रधान आवास योजनेत समाविष्ट करण्याच्या प्रयत्नांवरही मुनगंटीवार यांनी टीका सभागृहात केली.



संपादकीय

## नवसंजीवन

यशाकडे जाणारा मार्ग खडतर असला, तरी अथक परिश्रमाला पर्याय नसतो. प्रयत्ने वाळूचे कण रगडिता तेल ही गळे या उक्तीप्रमाणे कठोर मेहनतीच्या साक्षीने प्रत्यक्ष परमेश्वराला सुद्धा जाग करता येतं एवढी ताकद प्रयत्नांत असते. सडेतोड प्रयत्न करणाऱ्याला अपयशाचे काळे ढग अडवू शकत नाहीत या संदर्भातली एक कथा...पलीकडून फोन खणाणला, हॅलो डॉ. आनंद आहेत का? मला त्यांच्याशी बोलायचंय... मी सुमेधा बोलतेय. समोरून होल्डवर ठेवण्याइतपतही सुमेधाला उसंत नव्हती. जणू काही स्वतः डॉक्टर तिच्याशी बोलत असावेत. काडीचाही वेळ न दवडता सुमेधा बोलत होती. हॅलो डॉक्टर... माझा.. माझा सुहास, आज अंथरुणात उठून बसला. अकल्पित घडलंय सगळं. चमत्कार झालाय डॉक्टर... चमत्कार ... हे केवळ आपल्यामुळं शक्य झालंय. तिला झालेला आनंद पोटात मावत नसावा, कारण तिच्या चेहऱ्यावरचा आनंद बोलण्यातून व्यक्त होत होता. सुमेधा सुरेशाच्या लग्नानंतर तब्बल दोन वर्षानं सुहासरूपी बाळ जन्माला आलं होतं. नावाप्रमाणं गोंडस, गुटगुटीत, हुशार आणि चाणाक्षही. त्याच्या बाळलीला पाहताना त्यांचे डोळे भरून येत. मुलाच्या वाढत्या वयाबरोबर आयुष्यातला आनंद द्विगुणित करणारे अनेक प्रसंग हे दोघे, त्याच कुटुंब अनुभवत होते. या त्रिकोणी कुटुंबाचं आपलं आपलं मस्त चाललेलं पाहून शेजारच्यांनाही त्यांचा हेवा वाटे.

सुहास घडत होता. मोठा होत होता. एकेदिवशी शाळा सुटून कॉलेज पर्वात प्रवेश करण्याच्या काही दिवस आधी शेजारच्या इमारतीतील एका वृद्ध दांम्पत्याला रस्ता ओलांडून देताना समोरून येणाऱ्या भरधाव ट्रकने तिघांना चिरडलं होतं. काळाने घाला घातला होता. वृद्ध जागच्या जागी गतप्राण झाले आणि सुहास मानसिकता हरवून बसला ती कायमचीच. डोक्याला मार लागून फ्रॅक्चर झाल्यानं तो जखमी झाला होता. पुढे दवाखाना, औषधोपचार, डॉक्टरी सल्ले सगळं ओघाने आले. पण म्हणून कशाचीच उतराई होत नव्हती. दिवसेंदिवस बिघडत चाललेल्या तब्येतीमुळे सुहास जास्तीत जास्त अंथरुणात खिळून राहू लागला. डोक्याला जबरी मार लागलेला, कोमात गेलेला मुलगा बाहेर येईल का? कधी येईल? किती काळ लागेल? या गर्तेत कुठलीच दिशा सापडत नव्हती. मात्र सुमेधाच्या दैनंदिन पूजाअर्चा, नैवेद्य, प्रसाद लावणं वाढलं होतं. मुलाचं अपंगत्व सहन करण्याची ताकद असलेले दोघे त्याच्या मानसिक दुखण्याने त्रस्त होते. दिवस सरले, महिने उलटले तरी सुहासमध्ये म्हणावा तितका फरक पडला नव्हता. दरम्यान सुहासचा एस.एस.सी.चा रिझल्ट लागला. यामध्येही हुशार सुहास चांगल्या गुणांनी पास झाला, पण त्याचा काहीही उपयोग नव्हता. त्याच्या बाबतीत नियतीने काही वेगळं लिहून ठेवलं होतं. महिने उलटले. चौकशीला येणाऱ्या लोकांची संख्याही रोडावली. बिछान्यातलं जगणं हेच सुहासचं आयुष्य बनलं. मात्र थकले नव्हते ते सुरेश आणि सुमेधा. मुलाचं करताना लाखो हत्तीचं बळ कुठून आणत होते कुणास ठाऊक! तरी डॉक्टरांकडून मिळत असलेला धीर मोलाचा होता. औषधांच्या परिणामापेक्षा कुटुंबाला मानसिक आधार देण्याचं काम डॉ. आनंद नेमाने करत होते.महिने झाले तरी सुहासचं आजारपण बरं होण्याची चिन्हं नव्हती. कोमात असलेला माणूस बरा होऊन पूर्ववत व्हायला डॉक्टरी भाषेत अवधी लागतो, तो किती? आणि कसा? ते येणारी वेळच ठरवणार होती. या जंजाळात सुमेधाच्या आर्थिक परिस्थितीचं कंबरडं मोडलं होतं. त्यांचं होत नव्हतं ते सगळं दिर्घ आजारपणात गेलं. उरली होती, ती मुलाच्या बाबतीतली उदासीनता. ही उदासीनता घेऊन डॉक्टरी सल्ल्याने, खिन्न मनाने सुमेधा सुरेशनं सुहासला घरी आणण्याचा निर्णय घेतला. यापुढचं त्याचं विश्व, हे घर आणि घराच्या खिडकीला लागून असलेल्या भल्या मोठ्या वृक्षाच्या छायेखाली जाणार होतं. दरम्यान कितीतरी उन्हाळे, पावसाळे आले आणि गेले. विशीच्या आसपास असलेला तरणाबांड सुहास शरीर आणि मनाने मात्र थंड पडलेल्या कलेवरासारखा भासायचा. एकटक खिडकीतून बाहेर पहाताना त्याची नजर कोणाची तरी वाट पाहताना दिसे. दर दिवशी पहाटसमयी चिमण्यांचा जागर, कोकीळ बोली, पक्षांचा किलबिलाट या गोष्टी त्याच्या कानी पडत. चमत्कारिक ओढ लावणाऱ्या या गोष्टीत त्याचं मन रमे. पक्ष्यांची किलबिल ऐकू आली नाही, तर सुहासची नजर त्यांना शोधत राही.डोळ्यांतून पाणी येऊ लागे. या आणि अशा बऱ्याच गोष्टींची सुमेधा नोंद घेत होती. एव्हाना पानगळ सरून नवी पालवी फुटलेली. पक्षांनी सुद्धा काड्या गोळा करून घरट्यात अंडी घालायला सुरुवात केलेली. त्यातल्याच एका पक्षाचं पिल्लू खिडकीत येऊन बसे. त्याची चिवचिव, हालचाल याने सुहासचं लक्ष विचलित होई. दिवस दिवस हा खेळ चालत असे. पण एके दिवशी ते पिल्लू खिडकीत आलंच नाही. तेव्हाची सुहासची तगमग तिने अनुभवली होती. त्याचा श्वास, बोटांची हालचाल विलक्षण वाढली होती. डोळे भिरभिरत होते. या क्रमात अचानक बदल होऊन सुहास बिछान्यात उठून बसलेला दिसला. हे पाहताच सुमेधाचा आनंद गगनात मावेनासा झाला. पानाफुलांत भिरभिरणाऱ्या चिमुकल्या पक्षी जागराचा की औषधोपचारांचा परिणाम होता ठाऊक नाही, पण दैवी चमत्कार घडला होता. सुमेधाला हे सारं जाणून घ्यायचं नव्हतच मुळी. या क्षणी डॉ. आनंद यांना ही बातमी देऊन कृतकृत्य करायचा विचार तिने केला आणि फोन उचलला. हॅलो डॉ. मी सुमेधा बोलतेय. डॉक्टरांशी भडाभडा बोलून सुमेधा रड रड रडली. हे रडणं मागे सरलेल्या आयुष्यासाठी नव्हतं तर ते नव्यानं पुढे येणाऱ्या सुहासच्या स्वागतासाठी होतं. या प्रकरणात मी एक समजून चुकले की, मनापासून शर्थीचे प्रयत्न केले असता, चिकाटी, सातत्य शिकस्त मेळ साधतात. अचूक प्रश्नाला बिनचूक उत्तर सापडतात आणि उत्तरादाखल शेवट गोड होतो.

# जिल्हाधिकारी साहेब गायरान धारक मेल्यावर त्यांना न्याय मिळेल का?

### १ ऑक्टोबर १९८१ चा जप्ती पंचनामे व सबळ पुरावे असतानाही आजपर्यंत न्याय नाही!

## प्रशासनाकडून एकाला न्याय तर दुसऱ्या वर अन्याय का?

**माजलगांव । दर्शन डोंगरे**

तालुक्यातील नागडगाव येथील जुना सर्व्हे नबंर ३२ व गटनंबर ११० मधील गायरान जमीन ही गेल्या आनेक वर्षापासून दलीत कुटुंब जिवनाचा उदरनिर्वाह करत आहेत त्या जमिनीमध्ये शासन परिपत्रक दि.२८ नोव्हेंबर १९९१ प्रमाणे १ऑक्टोबर१९८१ ला जप्ती पंचनामा असताना ती जमिन नावावर झाली नाही नंतर कर्मवीर एकनाथरावजी आवाड ( जिजा ) यांनी महाराष्ट्रामध्ये गायरान धारकाची चळवळ उभी केली त्याही वेळेस २००६ ला मानवी हक्क अभियानच्या माध्यमातून नियमित होण्यासाठी तहसीलदार माजलगाव, उपविभागीय अधिकारी अंबाजोगाई ,जिल्हाधिकारी बीड,विभागीयआयुक्त औरगाबाद,मुबंई मंत्रालयामध्ये प्रस्ताव दाखल असताना देखील प्रशासनाने सपशेल डोळे झाक करून सर्वसामान्य गायरानधारकांची दिशाभुल केली असल्याचे दिसत आहे. आर व्ही भुस्कुटे यांच्या पिटेशन चा निकाल लागल्यानंतर कोर्टाने आदेश दिला की गायरान धारकाच्या याद्या जिल्हाधिकाऱ्यांच्या वेबसाईटवर अ आणी ब परिपत्र प्रसिद्ध केले आहे त्यामध्ये अ )१एप्रिल१९७८ ते १४ एप्रिल १९९० पर्यंत आहे ब)परिपत्र नंतर झालेली अतिक्रमण संदर्भात आहे

अ) परिपत्रात नाव असताना देखील प्रशासनाने गांभीर्याने घेऊन नागडगाव येथील गाय रान धारकांना न्याय दिला नाही यापुढे विभागीय आयुक्त औरंगाबाद यांचे १८ ऑक्टोबर १०१४ ला बीड जिल्हाधिकारी यांना पत्र आले होते प्रलंबित प्रकरणाचा अहवाल सादर करणेबाबत गायरान जमिनींचे नावे करण्याबाबत त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी यांनी माजलगाव तहसीलदार यांना ३१ ऑक्टोबर २०१४ ला पत्र व्यवहार करून प्रलंबित प्रकरणी सादर करण्यास सांगितले त्या अनुषंगाने पुन्हा पप्रस्ताव सादर करण्यात आला अध्यापही आम्हाला न्याय मिळाला नाही असे गायनधारकांचे म्हणणे आहे २५३ पानाचा अहवाल सादर असताना देखील जिल्हाधिकारी यांनी या प्रकरणांमध्ये हलगर्जीपणा केल्याचा दिसून येत आहे यामध्ये १ ते ११,आणी १ते २०, व १ते १२ मुद्द्यातील अहवाल तलाठी, मंडळ अधिकारी, तहसीलदार,उपविभागीय अधिकारी माजलगाव यांच्यामार्फत जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठवलेला असताना देखील या प्रकरणाकडे प्रशासनाने वेळोवेळी हलगर्जीपणा केल्याची दिसून येत आहे गरीब दलित समाज न्यायच्या प्रतिक्षेत किती दिवस जगणार आता तरी प्रशासनाने मुला बाळांचा कुटुंबाचा विचार करून या जमिनी नावावर केल्या पाहिजेत असा सुर उमटत आहे . जिल्हाधिकारी यांनी या प्रकरणांमध्ये तात्काळ अंमलबजावणी करून प्रलंबित असणाऱ्या प्रकरणाला न्याय द्यावा शासन निर्णय प्रमाणे पुरावे असून देखील गायनधारकांना प्रलंबीत का ठेवले जाते. आज तगायत पर्यंत या जमिनीमध्ये सात ते आठ पंचनामे झालेले असून १ ऑक्टोबर१९८१ पासून ते २०२५ पर्यंत सगळी कागदपत्रे जिल्हाधिकारी यांच्याकडे दाखल केलेली असून आज पर्यंत न्याय भेटलेला नाही न्याय मागायचा कुणाकडे हा प्रश्न गायरान धारकाकडून येत आहे . दिनांक ८ / सप्टेंबर / २०१४ /२०१५ रोजी जिल्हाधिकारी बीड यांनी गायरान जमीन प्रकरणे निकाली काढले आहेत ,नागडगावचे ही प्रलंबित प्रकरण निकाली काढावे अशी अर्त हक्क गायरान धारकाची येत आहे .

हिंगोली जिल्ह्यात सुद्धा २०१५ २०१६ मध्ये काही गायरान जमिनीचे प्रकरणे निकाली काढले आहेत

तहसील कार्यालय जालना कार्यक्षेत्रातील रामनगर येथील दिनांक २८ नोव्हेंबर२०२३ ला प्रलंबीत प्रकरणे निकाली काढले आहे.

सरकार व प्रशासनाला दलिता विषयी ४० ते ४५ वर्षाने प्रलंबित असणाऱ्या गायरान जमीन प्रकरणावर प्रश्नावर कधी न्याय देणार अशी शंका निर्माण होताना दिसत आहे !

दिनांक २८ नोव्हेंबर १९९१ शासन निर्णय प्रमाणे व १२ जुलै २०११ तील मुद्दा क्रमांक सहा नुसार प्रलंबित प्रकरणावर न्याय द्यावा अशी किंकाळी गायरान धारकातून येत आहे

# महावितरणचे २२८५ कंत्राटी कामगार कायम करा, हायकोर्टाचे आदेश

दैनिक वादळ वार्ता

**उरण । प्रतिनिधी**

महावितरण मधील वीज कंत्राटी कामगारांना कायम करावे या मागणी साठी महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ संलग्न भारतीय मजदूर संघाने २०१२ साली मा.मुंबई उच्च न्यायालयात धाव घेत ५६५६/२०१२ ही याचिका दाखल केली होती. मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाने हे प्रकरण मा.औद्योगिक न्यायालय, ठाणे येथे वर्ग करण्यात आले. एकूण २२८५ कामगार यात असून सातत्यपूर्ण १३ वर्षांच्या कायदेशीर लढ्यानंतर १७ जून रोजी मा.न्यायाधीश एस.झेड.सोनभद्रे यांनी ऐतिहासिक अवॉर्ड जाहीर केला होता.सदरील मा.कोर्टाचा अवॉर्ड ( निकाल ) बुधवार दि.१० डिसेंबर रोजी ल.य.भुजबळ, कामगार उपायुक्त महाराष्ट्र शासन (औद्योगिक विवाद) यांनी अधिकृतरीत्या संघटनेला दिला. यावेळी संघटनेचे अध्यक्ष निलेश खरात, सरचिटणीस सचिन मेंगाळे, उपसरचिटणीस राहुल बोडके, संघटन सचिव उमेश आणेराव व कोषाध्यक्ष सागर पवार हे कामगार आयुक्त कार्यालय मुंबई येथे उपस्थित होते.




**निकाला मधील महत्त्वपूर्ण मुद्दे:–**

१) महावितरण विभागातील कंत्राटी कामगार हे प्रत्यक्ष व कायम कामगार मानले जातील.

२) कंत्राटदार ही व्यवस्था केवळ नाममात्र/ बनावट असल्याचे न्यायालयाने मान्य केले आहे.

३ ) सन २०१२ पासून आतापर्यंतच्या कालावधीत महावितरणच्या कायम कामगारांप्रमाणे वेतन, भत्ते व सर्व तदनुषंगिक लाभ फरकासह देण्याचे आदेश.

४ ) सहा महिन्यांच्या आत अनुषंगिक लाभ न दिल्यास प्रलंबित रकमेवर ५% व्याज देणे बंधनकारक.

या निकालामुळे कंत्राटीकरणाच्या चुकीच्या प्रवृत्तीवर प्रभावी नियंत्रण येणार असून कंत्राटदार व मुख्य नियोक्ता या दोघांनाही जबाबदार धरण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या प्रकरणात कामगारांकडून १० तर व्यवस्थापनाकडून २ साक्षीदारांचे जबाब नोंदविण्यात आले.

या दीर्घ लढ्यात संघटनेच्या वतीने मुंबईचे ज्येष्ठ अँड. विजय पांडुरंग वैद्य,अँड.बाळासाहेब देसाई आणि अँड.शिरीष राणे यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.व्यवस्थापनाकडून अँड.एल.आर.मोहिते यांनी बाजू पाहिली.

**संघटनेची भूमिका व प्रतिक्रिया**

संघटनेचे मार्गदर्शक मा.अण्णा देसाई यांनी नमूद केले की न्यायदेवता न्याय देते यावर राज्यातील सर्व प्रकारचे कंत्राटी कामगार आता विश्वास ठेवातील.संघटनेचे अध्यक्ष निलेश खरात यांनी व्यक्त केले, ही ऐतिहासिक विजयकथा असून अनेकांनी कंत्राटी कामगारांची चेष्टा केली त्यांना हा निकाल एक चपराक आहे. ज्यांनी भारतीय मजदूर संघावर विश्वास ठेवला त्यांचा विजय झाला.सरचिटणीस सचिन मेंगाळे यांनी सांगितले हा निकाल देशभरातील कंत्राटी कामगार चळवळी साठी मैलाचा दगड ठरणार आहे. प्रलंबित कंत्राटी कामगारांना न्याय देण्यासाठी भारतीय मजदूर संघ कटिबद्ध आहे.

# चंद्रपुरातील नवरगावच्या मथुरा ताई प्रकरणी उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांची संवेदनशील दखल; प्रशासनाला तत्काळ व दीर्घकालीन उपाययोजनांचे निर्देश

### ज्या स्त्रीच्या वेदनेवरून कायदे बदलले, तिला समाजाने न्याय दिलाच पाहिजे–डॉ.नीलम गोऱ्हे

दैनिक वादळ वार्ता

**नागपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्ह्यातील नवरगाव येथे १९७२ मध्ये देशाला हादरवून सोडणाऱ्या अत्याचार प्रकरणातील पीडिता मथुरा ताईंना आजही आयुष्याच्या उत्तरार्धात हालाखीच्या परिस्थितीचा सामना करावा लागत असल्याची माहिती मिळताच विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी संवेदनशील दखल घेत स्वतः नवरगावला जाऊन त्यांची प्रत्यक्ष भेट घेतली. हलाखीच्या आणि अर्धांगवायूग्रस्त अवस्थेत राहत असलेल्या मथुरा ताईंसाठी डॉ. गोऱ्हे यांनी आवश्यक तातडीच्या व दीर्घकालीन उपाययोजनांचे स्पष्ट निर्देश प्रशासनाला दिले. यावेळी संतोष थिटे अतिरिक्त जिल्हाधिकारी, किशोर घाडगे एसडीओ, विजया झाडे तहसीलदार, आत्मज मोरे गट विकास अधिकारी व स्त्री आधार केंद्राच्या विश्वस्त जेहलम जोशी उपस्थित होत्या.डॉ. गोऱ्हे यांनी चंद्रपूर जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क साधून मथुरा ताईंना वैद्यकीय उपचार, पेन्शन, अन्नधान्य, घरकुल, आर्थिक ठेव तसेच सर्व संबंधित कल्याणकारी योजनांचा तात्काळ लाभ मिळवून देण्याचे निर्देश दिले होते. प्रशासनाने तत्परता दाखवत आवश्यक



सुविधा उपलब्ध केल्या असून आजच्या भेटीत डॉ. गोऱ्हे यांनी त्याचा सविस्तर आढावा घेतला. पुढील सहाय्य, पुनर्वसन आराखडा आणि देखरेख यंत्रणा याबाबत अधिकाऱ्यांसोबत त्यांनी सखोल चर्चा केली.याप्रसंगी डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, मथुरा ताईंच्या प्रकरणाचा उल्लेख माननीय सरन्यायाधीश भूषण गवई यांनीही केला होता. त्या काळी पीडित महिलेला न्याय नाकारला गेला आणि त्यानंतर 'कस्टोडियल जस्टिस टू विमेन' कायद्यात बदल घडवून आणण्यासाठी आम्ही विद्यार्थी व स्त्री मुक्ती आंदोलनात दीर्घ संघर्ष केला. जवळजवळ वीस वर्षांच्या लढ्यानंतर हा महत्त्वाचा कायदा देशाला मिळाला. त्या स्त्रीच्या वेदनेतून कायदा बदलला, पण आज त्या स्वतःच गंभीर विपन्नावस्थेत आहेत–ही बाब निश्चितच वेदनादायी आहे.मथुरा ताईंच्या कुटुंबाची परिस्थिती जाणून घेतल्यानंतर डॉ. गोऱ्हे यांनी त्यांच्या मुलांना स्थिर रोजगार, घरकुल आणि आवश्यक शासकीय लाभ तातडीने देण्याचे निर्देश दिले. कुटुंबासमोर वारंवार कागदपत्रांची मागणी करून अडथळे निर्माण करू नयेत. ग्रामसेवकाला नोडल अधिकारी नेमून प्रत्येक शासकीय भेटीची नोंद व फोटो जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवणे बंधनकारक करावे, असे त्यांनी ठामपणे सांगितले.त्या पुढे म्हणाल्या, अनेक लोक कागदपत्रे घेऊन जातात; पण त्याचा उद्देश मथुरा ताईंना कळत नाही. आता येणाऱ्याने ओळखपत्र दाखवणे बंधनकारक असावे. विधिमंडळ हे माणसांसाठी आहे; म्हणूनच अधिवेशन सुरू असतानाही मी इथे आले. ज्या स्त्रीच्या वेदनेवरून कायदे बदलले, त्या स्त्रीला समाजाने न्याय दिलाच पाहिजे. मथुरा ताईंच्या नावाने मदतीचा गैरवापर होऊ नये, हे सर्वांनी लक्षात ठेवले पाहिजे.माध्यमांनी दाखवलेल्या संवेदनशीलतेचे कौतुक करत त्या पुढे म्हणाल्या, न्याय नेहमी न्यायालयातूनच मिळतो असे नाही; काहीवेळा कायदे बदलूनही न्याय द्यावा लागतो. महिलांच्या चळवळीच्या इतिहासातील हे प्रकरण अत्यंत महत्त्वाचे आहे.डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या सक्रीय पुढाकारामुळे मथुरा ताईंच्या स्वास्थ्य, सुरक्षेसाठी सातत्याने देखरेख ठेवली जाणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

# 'हे' सुंदर फूल केवळ सजावटीसाठी नाही तर आरोग्यासाठी आहे फायदेशीर

आपल्या आसपास अशी अनेक फुले आहेत जी दिसायला खूप सुंदर आणि सुगंधित आहेत. त्यामुळे प्रत्येकजण त्यांच्या आवडीनुसार घराच्या भोवती लावता आणि ती फुलं तुमच्या घराचे सौंदर्य वाढवतात. अशातच असे एक फूल आहे जे तुमच्या घराचे सौंदर्य वाढवण्याबरोबरच तर तुमचे आरोग्य तंदुरस्त राखण्यासाठी खुप ओळखले जाते. आपण सूर्यफुलाबद्दल बोलत आहोत. हे फूल केवळ बागेपुरतेच मर्यादित नाही तर घराचे सौंदर्य वाढवण्या सोबत आरोग्यासाठी देखील उपयुक्त आहे. त्यात औषधी गुणधर्म देखील आहेत जे अनेक आरोग्य फायदे प्रदान करतात.

**सूर्यफूलाचे फायदे**

आयुर्वेदात सूर्यफुलाला खूप महत्व आहे. या फुलाचे बिया, पाने आणि तेल शतकानुशतके शारीरिक आणि मानसिक समस्यांवर उपचार करण्यासाठी वापरले जात आहेत.

सूर्यफूल फुलांमध्ये ट्रायटरपीन ग्लायकोसाइड्स नावाचे संयुगे भरपूर प्रमाणात असतात, जे बॅक्टेरियाशी लढण्यासाठी, वेदना कमी करण्यासाठी आणि जळजळ कमी करण्यासाठी अत्यंत प्रभावी असतात. ते अँटीऑक्सिडंट्समध्ये देखील समृद्ध असतात, जे हृदय आणि थायरॉईडच्या आरोग्यास समर्थन देतात. म्हणून या फुलाचे तेल आरोग्यासाठी जास्त फायदेशीर ठरतात.औषधी गुणधर्मांनी समृद्ध असलेल्या सूर्यफुलांचे सेवन केल्याने सांधेदुखी, संधिवात आणि शरीराच्या जडपणापासून आराम मिळतो.

जर तुम्हाला सतत बद्धकोष्ठता, पोटफुगी, गॅस आणि जंतांच्या समस्या असतील तर या समस्यांपासून मुक्त होण्यासाठी सूर्यफुलांचा वापर करता येतो. यामुळे पचनसंस्था मजबूत होते. सूर्यफुलाचे तेल, मलम किंवा बियांचे सेवन केल्याने फोड, खाज आणि त्वचेच्या आजारांवर फायदेशीर ठरते. आयुर्वेदिक तज्ञांच्या मते, जर तुम्हाला ताप असेल तर तुम्ही सूर्यफुलाच्या पानांपासून बनवलेला काढा किंवा चहा घेऊ शकता. सूर्यफुलाची फुले हृदय आणि थायरॉईडसाठी देखील चांगली असतात. अँटीऑक्सिडंट्सने समृद्ध असल्याने हे फुल हृदयरोगापासून संरक्षण करण्यास मदत करू शकतात. सूर्यफुलाच्या बियांमध्ये ओमेगा-६ फॅटी सिड, व्हिटॅमिन ई, मॅग्नेशियम, सेलेनियम आणि झिंक भरपूर प्रमाणात असतात. तुम्ही तुमच्या जेवणात सूर्यफूल तेल वापरा. कारण हे तेल शरीरात चांगले कोलेस्ट्रॉल वाढवते. तथापि ते सेवन करण्यापूर्वी आयुर्वेदिक डॉक्टरांचा सल्ला घ्या.

# कात्री गावात विकासाचा नवा अध्याय

## नंदुरबार जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा.नमन गोयल यांच्या दौऱ्याने ग्रामविकासाला नवी चालना

### अंबाडी उद्योगाचे विशेष कौतुक; जलसंधारण आणि शिक्षण क्षेत्राची घेतली सखोल माहिती

दैनिक वादळ वार्ता

**रवींद्र वळवी । मोलगी**

नंदुरबार जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल यांनी दिनांक ११ डिसेंबर २०२५, वार गुरुवार रोजी ग्रुप ग्रामपंचायत कात्री गावाला सदिच्छा भेट देऊन येथील विविध विकासकामांची सखोल पाहणी केली. प्रशासनाची पायाभूत सुविधा, ग्रामविकास आणि सार्वजनिक सेवांबाबतची कटिबद्धता या उच्चस्तरीय दौऱ्यातून अधोरेखित झाली. गोयल दुपारी १:३० वाजता सूर्यदर्शन शेतकरी उत्पादक कंपनी, कात्री येथून पाहणी दौऱ्यास सुरुवात केली. त्यांनी कंपनीतील कार्यपद्धती, शेतकऱ्यांना मिळणाऱ्या सेवा, उत्पादन व्यवस्थापन यांसारख्या बाबींची माहिती घेतली. दौऱ्यादरम्यान खालील महत्त्वपूर्ण प्रकल्पांना भेट देऊन कामकाजाचा आढावा घेतला व आवश्यक त्या सूचना दिल्या.अंबाडी प्रक्रिया उद्योगाची पाहणी करताना गोयल साहेबांनी अंबाडी शरबताची प्रत्यक्ष चव घेतली. अत्यंत चांगला व आदर्श ठरेल असा प्रयोग आहे, असे विशेष कौतुक व्यक्त करून त्यांनी स्थानिक उद्योजकांना मोठी प्रेरणा दिली. जल व वनसंधारण: शेततळे व वनराई बंधाऱ्यांच्या माध्यमातून केलेल्या जलसंधारण, पाणीसाठा आणि जलव्यवस्थापनाच्या कामांची पाहणी करून समाधान व्यक्त केले. तसेच वनराई प्रक्षेत्राला भेट देऊन वृक्षारोपण, साळसूद संवर्धन आणि पर्यावरणपूरक उपक्रमांचा आढावा घेतला. शिक्षण



आणि सुविधा: जिल्हा परिषद शाळा, कात्री येथे विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध सुविधा, शैक्षणिक वातावरण आणि चालू उपक्रमांबाबत सविस्तर चर्चा केली. तसेच अभ्यासिका केंद्राला भेट देऊन विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी तयार केलेल्या सुविधांची पाहणी करून गुणवत्ता वृद्धीसाठी मार्गदर्शन केले.प्रशासन आणि आरोग्य सेवा: ग्रामपंचायत कार्यालयात प्रशासकीय शिस्त आणि नागरिकांना पुरवल्या जाणाऱ्या सेवांबाबत चर्चा केली. अंगणवाडी केंद्रामध्ये बालसंगोपन आणि पोषण आहार व्यवस्थेची पाहणी केली, तर प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट देऊन ग्रामस्थांना दिल्या जाणाऱ्या आरोग्य सेवांची माहिती घेतली व सुधारणांसाठी सूचना केल्या.

**मान्यवर आणि ग्रामस्थांची उपस्थिती**

या महत्त्वपूर्ण दौऱ्याच्या वेळी ग्रामस्थांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला. यावेळी मा.श्री. संदीप वळवी (सरपंच), मा. छोटू बच्छाव (ग्रामपंचायत अधिकारी), मा.श्री. सुभाष पाडवी (उपसरपंच), सर्व ग्रामपंचायत सदस्य, अंगणवाडी सेविका, रोजगार सेवक, आशा सेविका तसेच मोठ्या संख्येने कात्री ग्रामस्थ उपस्थित होते.

# कोंडाईबारी घाट 'मृत्यूचा सापळा': आज पुन्हा अपघात निष्काळजी प्रशासनाला 'झोपे'तून जाग कधी येणार?

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

नवापूर तालुक्यातील कोंडाईबारी घाटाने आता अक्षरशः 'मृत्यूच्या सापळ्याचे' रूप धारण केले आहे. अपघातांची मालिका दिवसेंदिवस भयावह रूप घेत असतानाही, प्रवाशांच्या सुरक्षेची जबाबदारी असलेल्या महामार्ग प्राधिकरणाचा निष्काळजीपणा आणि बेफिकिरी उघडपणे समोर येत आहे. संतप्त नागरिक आणि वाहतूकदारांनी प्रशासनाला जाग कधी येणार? असा आक्रोश करत तीव्र संताप व्यक्त केला आहे.दिनांक ११ रोजीचा अपघाताचा धक्का ताजा असतानाच,दिनांक १२ रोजी पुन्हा त्याच धोकादायक वळणावर जि.जे. ०८ ए यू ०९८१ क्रमांकाच्या ट्रालाने अपघातग्रस्त गाडीला धडक दिली आणि परिस्थिती अधिक गंभीर केली. लोखंडी



सळईने भरलेला हा ट्राला अपघातग्रस्त होणे, हे स्पष्टपणे दर्शवते की हा घाट वाहतुकीसाठी किती धोकादायक बनला आहे. सुदैवाने यावेळी जीवितहानी टळली असली तरी, वारंवार एकाच स्थळी होणारे अपघात हे प्रशासनाच्या गलथान आणि बेजबाबदार कारभाराचे जळजळीत उदाहरण आहे. कोंडाईबारी घाटात ना योग्य सुरक्षा व्यवस्था, ना धोकादायक वळणांवर आवश्यक असणारे दिशादर्शक फलक, ना तातडीने मदत पुरवणारी आपत्कालीन यंत्रणा उपलब्ध आहे. अधिकारी मात्र गाढ झोपेत आहेत आणि प्रवाशी मृत्यूच्या दाढेतून प्रवास करत आहेत.

कोंडाईबारी घाटाचा हा 'मृत्यूमार्ग' तातडीने सुधारला गेला नाही, तर मोठी जीवितहानी होणे केवळ वेळेचा प्रश्न आहे. जनतेचा संयम आता संपत चालला आहे.

यासाठी धोकादायक वळणांवर आणि उतारावर त्वरित संरक्षक भिंती उभाराव्यात. अपघातप्रवण क्षेत्राचे फलक आणि परावर्तित दिशादर्शक फलक तातडीने लावावेत. घाटातील रचना तपासून कायमस्वरूपी संरचनात्मक सुधारणा करावी अशी मागणी वाहनधारकांकडून तसेच परिसरातील ग्रामस्थांकडून केली जात आहे.

प्रशासनाने या गंभीर विषयावर तातडीने कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अन्यथा निष्क्रियतेविरुद्ध जनक्षोभ उसळून मोठे आंदोलन उभे राहण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

# दिव्यात रुपेन तन्ना मेमोरियल ट्रस्टकडून अपंग व विधवांना अन्नधान्य किट वाटप

दैनिक वादळ वार्ता

रुपेन तन्ना मेमोरियल ट्रस्ट'च्या वतीने दिवा शहरात एडो. उषा तन्ना यांच्या सौजन्याने जागतिक अपंग दिनाचे औचित्य साधून दिवा शहरातील अपंग व गरीब विधवा महिलांना अन्नधान्य किट वाटप करण्यात आले. दिवा शहरातील दातीवली येथील 'दिवा पब्लिक स्कूल'च्या परिसरात हा कार्यक्रम पार पडला.

दिवा परिसरातील गोर-गरीब, दिन-दुबळे, अपंग बांधव आणि विधवा महिला असे एकूण २५० गरजूंना मोफत अन्नधान्य किटचे वाटप करण्यात आले. या सामाजिक कार्यात दिवा पब्लिक स्कूलचे संचालक विनोद पाटील सर यांचे मोलाचे सहकार्य लाभले. प्रसंगी समाजसेविका एडो. उषा तन्ना यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाल्या की, समाजसेवेचे व्रत मी स्वीकारले असून, माझ्या दोन्ही हातांनी जितके देता येईल तितके दान मी आयुष्यभर गरिबांना देत राहणार आहे. त्यांच्या या भावनांनी उपस्थितांची मने जिंकली. या उपक्रमाचे सर्वस्तरातून कौतुक होत असून



गरजूंच्या चेहऱ्यावर समाधान पाहायला मिळाले. प्रसंगी रवी कदम, अनिल पाटील, आदित्य कदम, भरत मोहिते, धनाजी पोवार आणि अमोल यादव हे उपस्थित होते. प्रसंगी पब्लिक स्कुलच्या प्रिया पाटील मॅडम यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष मेहनत घेतली.

# चेंबूर तालुका राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे शरद पवारांचा वाढदिवस साजरा

दैनिक वादळ वार्ता

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांचा ८५ वा वाढदिवस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस रवींद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली चेंबूर तालुक्याच्यावतीने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी ज्येष्ठ नागरिकांना भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणुन मुंबई उपाध्यक्ष मुबारक खान, नवाकाळचे उपसंपादक शंकर कडव,चेंबूर तालुका अध्यक्ष दीपक सावंत,अणुशक्ती नगर तालुकाध्यक्ष संजय कांबळे,मुंबई सरचिटणीस जितेंद्र शिंदे,अपंग अंध अध्यक्ष चेंबूर समिती अध्यक्ष वंदना दीपक सावंत, मुंबई सहसचिव अजय काळे सामाजिक न्याय विभागाचे कांबळे, प्रभाग अध्यक्ष महादेव शिंदे,अध्यक्ष जगदीश दया,उपाध्यक्ष भालचंद्र पाटील,जिल्हा सचिव प्रवीण घाडगे,जिल्हा सचिव रामचंद्र मिस्त्री, तालुका सरचिटणीस शिवाजीराव



पवार, तालुका उपाध्यक्ष लता घाडगे,तालुका सचिव सायली पेडणेकर, तालुका उपाध्यक्ष रत्नप्रभा मेजारे,तालुका सचिव वनिता गुडेकर, तालुका सचिव अनिता बागुल,तालुका उपाध्यक्ष संदीप पडावे,युवक अध्यक्ष संजय कोळी, उपाध्यक्ष संजय प्रजापती,संदेश मोहिते, श्रीधर पांचाळ,युग सिंग, उपाध्यक्ष गीता कदम, इंदुताई चिवलकर, सिद्धेश ठाकूर,हरिचंद्र परब, श्रीधर पांचाळ आणि कार्यकर्ता महिला पुरुष उपस्थित होते.

# नंदुरबार राष्ट्रीय लोकअदालतीचा ऐतिहासिक दिवस: ४११ प्रकरणांचा निपटारा, १२.८२ कोटींची विक्रमी तडजोड!

### पती-पत्नी वादातील ५ जोडप्यांच्या संसारात पुन्हा गोडवा; नागरिकांना जलद, सुलभ व खर्चविरहित न्याय

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

राष्ट्रीय लोकअदालतीच्या निमित्ताने १३ डिसेंबर २०२५ रोजी नंदुरबार जिल्ह्यातील सर्व न्यायालयांमध्ये तडजोडपात्र प्रलंबित दिवाणी व फौजदारी प्रकरणे तसेच दाखलपूर्व प्रकरणे आपसी तडजोडीसाठी ठेवण्यात आली होती. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश किशोर आर. पेठकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या लोकअदालतीमुळे नागरिकांना जलद, सुलभ व खर्चविरहित न्याय मिळाला.

या लोकअदालतीत संपूर्ण जिल्ह्यातून एकूण ४११ प्रकरणे सामंजस्याने निकाली काढण्यात आली. विशेष म्हणजे, या निकाली काढलेल्या प्रकरणांमधून



१२,८२,६३,७२९ (बारा कोटी ब्याऐंशी लाख त्रेसष्ट हजार सातशे एकोणतीस रुपये) इतक्या विक्रमी रकमेची तडजोड करण्यात आली.

लोकअदालतीदरम्यान पती-पत्नी वादाच्या पाच (५) प्रकरणांमध्ये यश आले. दोन्ही बाजूंच्या विधिज्ञांनी केलेल्या सहकार्यामुळे या जोडप्यांमध्ये तडजोड होऊन त्यांचा संसार पुन्हा सुरू झाला. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश किशोर आर. पेठकर यांनी या यशस्वी पक्षकारांचे यावेळी अभिनंदन केले.

या राष्ट्रीय लोकअदालतीच्या प्रसंगी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश किशोर आर. पेठकर, तदर्थ जिल्हा न्यायाधीश पी. एच. कर्वे, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर सतीश टी. मलिये, मुख्य न्यायदंडाधिकारी के. ए. नहार, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव महेंद्र बी. पाटील यांच्यासह जिल्ह्यातील सर्व न्यायाधीश व वकील संघाचे पदाधिकारी (ॲड. सावंत वळवी, ॲड. सारंग गिरनार, ॲड. मोहनसिंग गिरासे) मोठ्या संख्येने उपस्थित होते.

न्यायालयीन कर्मचारी आणि विधिज्ञांच्या सहकार्यामुळे ही लोकअदालत यशस्वी झाली असून, यामुळे न्यायालयांवरील ताण कमी होऊन नागरिकांना त्वरित न्याय मिळत असल्याबद्दल समाधान व्यक्त करण्यात आले.

### भारतीय संविधानाच्या ७५ व्या अमृत महोत्सवानिमित्त

# 'संविधान वाचन पंधरवाडा' चे आयोजन : कास्ट्राईब

दैनिक वादळ वार्ता

**माजलगाव । दर्शन डोंगरे**

महा.राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ माजलगावच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका,पंचायत समिती समोर येथे भारतीय संविधानाच्या ७५ व्या अमृत महोत्सवानिमित्त लाऊड स्पीकर वरून दि.१४ डिसेंबर ते २९ डिसेंबर या कालावधीत रोज सायंकाळी ७:०० वाजता 'संविधान वाचन पंधरवाडा' या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. संविधानाबाबत जनजागृती वाढवणे, संविधानिक मूल्ये समाजात रुजवणे आणि लोकशाहीची जाणीव बळकट करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

या संविधान वाचन पंधरवाडा कार्यक्रमाचे उदघाटक राहुल सूर्यतळ,पोलीस निरीक्षक माजलगाव.अध्यक्ष भारत टाकणखार जिल्हा संघटन प्रमुख कास्ट्राईब तर प्रमुख पाहुणे सूर्यकांत जोगदंड,बाळासाहेब सोनवणे हे असणार आहेत.हा संपूर्ण कार्यक्रम नूरखा पठाण लिखित आपले संविधान : राज्यपद्धती नव्हे तर जीवनपद्धती या पुस्तकातील अनुच्छेद १ ते ५१ पर्यंतचे वाचन करण्यावर आधारित



आहे.या अनुच्छेदाचे वाचन विविध मान्यवर वक्त्यांच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. संविधानातील मूलभूत अधिकार,राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वे व नागरिकांची कर्तव्ये यांचे सखोल वाचन व चिंतन या उपक्रमातून घडणार आहे.यासोबतच संविधानाच्या मूल्यांवर आधारित कवी संमेलन महाराष्ट्राचे प्रख्यात कवी प्रभाकर साडेगावकर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आले असून यामध्ये परिसरातील अनेक कवी,कवयित्री सहभागी होणार असून ते आपल्या कवितांतून स्वातंत्र्य,समता,बंधुता, न्याय आणि लोकशाही या संविधानिक संकल्पनांचे प्रभावी सादरीकरण करणार आहेत. संविधानाला केवळ कायद्याचा ग्रंथ न मानता जीवनपद्धती म्हणून स्वीकार करण्याचा संदेश देणारा हा महत्त्वपूर्ण कार्यक्रम असून या पंधरवड्यात जास्तीत जास्त या कर्मचारी,विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते आणि संविधानप्रेमी नागरिकांनी सहभागी संविधानिक मूल्यांचे संवर्धन करावे असे आवाहन निमंत्रक तथा कास्ट्राईब तालुकाध्यक्ष राहुल टाकणखार व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व माजी खासदार सुजय विखे पाटील यांच्या विशेष निधीतून नागापुर बोल्हेगावचा विकास



दैनिक वादळ वार्ता

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

नागापुर बोल्हेगाव परिसरातील आदर्श नगर भागातील अत्यंत जीर्ण झालेल्या रस्त्याच्या काँक्रिटीकरण कामाचा शुभारंभ ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते करण्यात आला. खळेकर घर ते आझाद चौक या पहिल्या टप्प्याच्या कामासाठी लागणारा निधी जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी जिल्हा नियोजन समितीमधून विशेष प्रयत्न करून उपलब्ध करून दिला आहे, असे आकाश कातोरे यांनी सांगितले.

या रस्त्याच्या दयनीय अवस्थेबाबत स्थानिक नागरिकांनी शिवसेना युवा सेनेचे जिल्हाप्रमुख आकाश कातोरे यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला. नागरिकांचे प्रश्न तातडीने सोडवणारे युवा नेते म्हणून ओळख असलेल्या आकाश कातोरे यांनी हा मुद्दा माजी खासदार सुजय विखे पाटील यांच्या समोर ठामपणे मांडला. त्यांच्या सततच्या पाठपुराव्यानंतर या कामासाठी एकूण ३० लाख रुपये निधी मंजूर झाला असून काम दोन टप्यांमध्ये राबवण्यात येणार आहे.पहिला टप्पा खळेकर घर ते आझाद चौक, तर दुसरा टप्पा आझाद चौक ते पितळे कॉलनी असा असून संपूर्ण मार्गाचे काँक्रिटीकरण पूर्ण झाल्यानंतर आदर्श नगर परिसराला अत्यंत दिलासा मिळणार आहे.या भागातील नागरिकांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी खासदार सुजय विखे पाटील आणि आकाश कातोरे यांचे मनापासून आभार व्यक्त केले. त्याचबरोबर, मागील पंचवार्षिक निवडणुकीनंतर निवडून आलेले नगरसेवक कधीही परिसरात न फिरकता केवळ निवडणुकीपुरतीच आश्वासने देतात, असा आरोपही नागरिकांनी नोंदवला.कार्यक्रमास कल्हापुरे साहेब, पाखरे सर, आबा देवढे, वाळके मामा, अशोक कोकाटे, राऊसाहेब पुंड, महाजन काका, बबुशेठ सुराणा, दीपक गायकवाड, भारत रोडे, वाळके मावशी,गटकळ साहेब तसेच मोठ्या संख्येने स्थानिक नागरिक उपस्थित होते.ही कामे पूर्ण झाल्यानंतर नागापूर बोल्हेगाव परिसरातील वाहतुकीची सोय मोठ्या प्रमाणात सुधारेल, असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला

# दिवंगत लोकनेते स्व.गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या जयंती निमित्त ४२ रक्तदात्यांनी केले रक्तदान

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

जीवन विकास शिक्षण मंडळ केज आयोजित स्वामी विवेकानंद विद्यामंदिर माध्यमिक विभाग केज या शाळे मध्ये दिवंगत लोकनेते स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या ७६ व्या जयंतीनिमित्त दि.१२ डिसेंबर २०२५ शुक्रवार रोजी एकूण ४२ रक्त दात्यांनी रक्तदान करून रक्तदान चळवळीवरील आपले प्रेम व्यक्त केले. याप्रसंगी कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून जीवन विकास शिक्षण मंडळ या संस्थेचे अध्यक्ष अंकुशरावजी इंगळे हे उपस्थित होते.तर प्रमुख पाहुणे म्हणून रक्तपेढी प्रयोगशाळा तंत्रज्ञ उप जिल्हा रुग्णालय केज श्रीकृष्ण नागरगोजे उपस्थित होते.इतर मान्यवर उपस्थितीमध्ये संस्थेचे सचिव जी.बी. गदळे,मा.वि.चे मु.अ. शिवनंदा मुळे,प्रा.वि.चे मु. अ.वसंत शितोळे,स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूल चे मु.अ.गणेश कोकीळ, प्राचार्य शंकर भैरट, सेवानिवृत्त शिक्षक हनुमंत घाडगे आदी उपस्थित होते.सदरील रक्तदान शिबिर हे मागील ३० वर्षापासून या शाळेमध्ये आयोजित केले जाते. यावर्षी सदरील शिबिराने ३१ व्या वर्षात पदार्पण केले आहे.मागील ७ वर्षापासून हे शासकीय शिबिर सुरू आहे.या शिबिराचा सर्वसामान्य याचकाला उपयोग होतो. रक्तदानाबद्दल रक्तदात्या मध्ये बरेच गैरसमज असतात परंतु रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. वयाच्या १८ ते ५५ वर्षा पर्यंत आपण रक्तदान करू शकतो,रक्तदान केल्याने बरेच आजार कमी होतात,रोगप्रतिकार शक्ती वाढते,वजन कमी होते तसेच ७२ तासांमध्ये दिलेले रक्त पुन्हा परत येते.दर ६ महिन्याला रक्तदान केले पाहिजे जेणेकरून याचकाचे प्राण वाचतील.याप्रसंगी माजी विद्यार्थी डॉ.अशोक डोईफोडे,सहशिक्षक महादेव गिरी तसेच कैलास अंधारे हे या शिबिराचे पहिले रक्तदाते ठरले.या शिबिराच्या यशस्वीतेसाठी डॉ. श्रीकृष्ण नागरगोजे, रक्तपेढी प्रयोगशाळा तंत्रज्ञ उपजिल्हा रुग्णालय केज व जिल्हा रुग्णालय बीड तसेच सतीश गायकवाड लॅब असिस्टंट, विनोद रावताडे लॅब टेक्निशियन तर युवराज बाबरे,हेमंत बेलदार,वैभव टाकळे यांनी ब्रदर्स म्हणून विशेष परिश्रम घेतले.



तसेच या कार्यक्रमाचे औचित्य साधून युवा मास्टरस्ट्रोक कॉम्पिटिशन च्या वतीने घेण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धा परीक्षेमध्ये आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश मिळविले. यामध्ये सातवी ते दहावी गटातून कु.वेदिका सिद्धेश्वर घुले ७ वी, अनुष्का बाळासाहेब अहंकारे ७ वी,यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.वरील यशस्वी विद्यार्थ्यांना शाळेतील चित्रकला शिक्षक दादासाहेब गायकवाड यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रबोधकांत समुद्रे यांनी मानले.

# श्रीनिवास राऊत यांना पितृशोक बबनराव राऊत यांचे दु:खद निधन

दैनिक वादळ वार्ता
**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**



परळी शहरातील किर्तीनगर येथील रहिवासी श्रीनिवास राऊत यांचे वडील कै.बबनराव पिलोबा राऊत यांचे अपघाती दुःखद निधन झाले. घटनेनं परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मृत्यू समयी त्यांचे वय ५५ वर्ष होत. किर्तीनगर येथील रहिवासी श्रीनिवास राऊत यांचे वडील कै. बबनराव पिलोबा राऊत यांचे परळी ते गंगाखेड रोडवर ऍटो पलटी होऊन अपघातात दुःखद निधन झाल्याची घटना घडली. जखमीना परळी उपजिल्हा रुग्णालय येथे दाखल करण्यात आले होते. या घटनेनं परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. पोलिस प्रशासनाने पंचनामा करून पुढील कारवाई सुरू आहे.

कै.बबनराव पिलोबा राऊत हे अत्यंत मनमिळावू, सुस्वभावी तथा धार्मिक वृत्तीचे सर्वांसोबत स्नेहबंध जपणारे व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुले, मुली, सुना, नातवंडे असा भरगच्च परिवार आहे. कै. बबनराव पिलोबा राऊत यांच्या पार्थिवावर दिनांक १३ डिसेंबर रोजी सकाळी ११ :वाजता वैद्यनाथ मंदिर परिसरातील सार्वजनिक स्मशानभूमी या ठिकाणी अंतिम संस्कार करण्यात आले.

# शिवसेना उबाठा जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूक ताकतीने लढवणार बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुराम जाधव यांचा केज येथील बैठकीत निर्धार

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**



शिवसेना पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे यांच्या आदेशावरून शिवसेना नेते माजी विरोधी पक्षनेते अंबादासजी दानवे, मराठवाडा समन्वयक उपनेते विश्वनाथ नेरूरकर उपनेत्या सुषमाताईअंधारे यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुराम जाधव यांच्या उपस्थितीत व माजी जिल्हाप्रमुख रत्नाकर शिंदे यांच्या अध्यक्षते खाली केज,अंबाजोगाई, परळी तालुका शिवसेना, युवा सेना,महिला आघाडी पदाधिकाऱ्याची बैठक बीड जिल्हा संपर्क कार्यालय केज येथे संपन्न झाली.सदरील बैठकीत येणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकी संदर्भात गट निहाय,बुथनिहाय चर्चा करण्यात आली.येणाऱ्या निवडणुकीत शिवसेना पक्षप्रमुख माजीमुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे यांच्या समवेत सर्व शिवसेना नेते, उपनेते,खासदार,आमदार स्टारप्रचारक ताकतीनिशी निवडणूक रिंगणात उतरणार आहेत करिता पूर्व नियोजनासाठी अंबाजोगाई,परळी,केज तालुक्यातील सर्व पदाधिकाऱ्यांनी जिल्हा परिषद व पंचायत समिती सर्कल निहाय बैठका घेऊन चार दिवसात अहवाल सादर करण्याचे संपर्क प्रमुख यांनी आवाहन केले.यावेळी बैठकीला मा.जिल्हाप्रमुख रत्नाकर शिंदे,उपजिल्हा प्रमुख दीपक मोराळे, नारायणजी सातपुते, सचिव रोहित कसबे, संघटक अशोक गाढवे, केज तालुका प्रमुख अशोक जाधव, अंबाजोगाई तालुकाप्रमुख श्रीधर गरड,परळी तालुकाप्रमुख भोजराज पालीवाल,शहर प्रमुख अशोक हेडे,राजेश विभुते तात्या रोडे,उपतालुका प्रमुख महेश केंद्रे, आप्पासाहेब कांबळे, सुभाष ठोंबरे,सुरज वाघमारे,लक्ष्मण गलांडे, बापू गोरे,बाळासाहेब कसबे,उगलमुगले,पप्पू ढगे,आतम घाडगे माजी उपसभापती शशिकांत तारळकर,निलेश जाधव, बाळू फुलझलके सह शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते.

# जेष्ठ नेते दत्ताप्पा इटके गुरूजी यांना राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार जाहीर

## महाराष्ट्र वीरशैव लिंगायत सभा पुणेच्या वतीने २१ डिसेंबर रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत होणार पुरस्कार प्रदान

दैनिक वादळ वार्ता
**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

समाजासाठी निस्वार्थ वृत्तीने कार्य करणारे, सेवाभाव जपणारे आणि परळी वैजनाथ येथील वीरशैव लिंगायत समाजाचे जेष्ठ नेते दत्ताप्पा इटके गुरूजी यांच्या कार्याचा गौरव म्हणून महाराष्ट्र वीरशैव लिंगायत सभा (पुणे) तर्फे राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कारासाठी त्यांची निवड करण्यात आली आहे. दत्ताप्पा इटके गुरुजी यांनी जीवनभर शिक्षण, संस्कार, धार्मिक व सामाजिक कार्यांद्वारे परळी तालुक्यात एक वेगळा ठसा उमटवलाआहे. दत्ताप्पा इटके गुरूजी यांनी गेल्या अनेक दशकांपासून समाजउद्धार, शिक्षण, संस्कार, सांस्कृतिक जपणूक, सामूहिक विवाह उपक्रम, गरजू कुटुंबांची मदत, आरोग्य शिबिरे, धार्मिक कार्यक्रम आणि समाजातील ऐक्य व एकात्म्यासाठी उल्लेखनीय कार्य केले आहे. समाजहितासाठी त्यांनी केलेल्या या मोलाच्या योगदानाची दखल घेत सभेच्या प्रदेश समितीने हा मानाचा पुरस्कार जाहीर केला असल्याचे सभेचे सरचिटणीस चंद्रशेखर (बाळासाहेब) होनराव यांनी पत्राद्वारे कळविले आहे. या पुरस्काराचा वितरण सोहळा दि. २१ डिसेंबर २०२५ रोजी सप्तशृंगी गड, ता. कलवन, जि. नाशिक येथे संपन्न होणार आहे. या प्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती अपेक्षित असून परळी परिसरातूनही मोठ्या प्रमाणावर प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.



**दत्ताप्पा इटके गुरुजींच्या कार्याचा विशेष उल्लेख**

या प्रसंगी परळी शहरातील विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांमध्ये महत्वपूर्ण भूमिका बजावणारे वैजनाथ विद्यालयाचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक दत्तात्रय गणपतराव (दत्ताप्पा) इटके गुरुजी यांच्या कार्याचाही विशेष गौरव करण्यात आला. त्यांनी केलेले सामाजिक कार्य हे परळीच्या विकासाचा पाया मानले जाते. त्यांच्या प्रमुख कार्यामध्ये पुढील गोष्टींचा समावेश- सन १९७४ पासून परळी वैजनाथ येथे अतिरुद्र अभिषेकामध्ये सहभाग विद्यार्थ्यांसाठी हनुमान व्यायाम शाळामार्फत व्यायाम प्रशिक्षण व संस्कार शिबिरांचे ३० वर्षे आयोजन समाजातील बांधवांच्या ऐक्यसाठी बसवेशकॉलनीत १५० कुटुंबांना निवास व्यवस्था १९८२ पासून २२ वर्षे सामूहिक विवाह सोहळ्यांचे आयोजन, २००० गरीब कुटुंबातील मुला-मुलींचे विवाह संपन्न विविध शिवाचार्यांच्या अधिक मास व श्रावण मास अनुष्ठानांचे आयोजन महात्मा बसवेश्वर जयंती सोहळे, वृक्षारोपण, महिला-पुरुष भजन स्पर्धा, रंगोळी स्पर्धा रक्तदान शिबिर, रक्तगट तपासणी व आरोग्य शिबिरे वीरशैव समाजातील आचार्यांचे तपोधन कार्यक्रम परळी नगरपरिषदेत १५ वर्षे नगरसेवक, उपनगराध्यक्ष पदावर कार्य श्री क्षेत्र कपिलधार येथे १० कोटींचे विकास आराखडे मंजूर करण्यात महत्वपूर्ण भूमिका

# दिव्यात मध्यरात्री पोलिसांचे कोम्बिंग व रूट मार्च



दैनिक वादळ वार्ता

मुंब्रा पोलीस ठाणे अंतर्गत दिवा पोलीस चौकी हद्दीत मा. सहाय्यक पोलीस आयुक्त प्रिया डमाळे कळवा विभाग, ठाणे यांचे उपस्थितीत दिवा शहर परिसरात कोम्बिंग ऑपरेशन आयोजित करण्यात आले होते. सदर कोम्बिंग दरम्यान श्री राजू पाचोरकर, पोलीस निरीक्षक, मुंब्रा पोलीस स्टेशन, ५ पोलीस अधिकारी व ३१अंमलदार, RCP व गोपनीय अंमलदार रवि सातपुते हजर होते. कोम्बिंग ऑपरेशन दरम्यान एकूण २३ आरोपी चेक केले.सदर कोम्बिंग दरम्यान महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ प्रमाणे ०१ नुसार कारवाई, महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १२२ (क) प्रमाणे ०१ कारवाई, महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम ६५ ई प्रमाणे ०२ कारवाई, कोफ्ता क्ट १ तसेच ३३ W १३१ प्रमाणे १ कारवाई करण्यात आली. तसेच दिवा पोलीस चौकी ते गणेश नगर -गणेश पाडा -दातिवली स्टेशन -दातिवली स्मशानभूमी-श्लोक नगर-दिवा रेल्वे स्टेशन, प्लॅटफॉर्म नंबर ०८-रिलायन्स टॉवर-मुंब्रादेवी कॉलनी-दिवा रेल्वे स्टेशन-साबेगाव-भगतवाडी ते छत्रपती शिवाजी महाराज चौक दिवा असा रूट मार्च काढण्यात आला.

## भारतीय जनता मजदुर संघाचे मराठवाडा सचिव

# चंद्रकांत पाटील यांचा विष्णु भाऊ घुले यांच्या हस्ते सत्कार संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

भारतीय जनता मजदुर संघाच्या मराठवाडा सचिव पदावर निवड झाल्याबद्दल चंद्रकांत पाटील यांचा विष्णु भाऊ घुले यांच्या सह मित्र परिवार यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.यावेळी पत्रकार धनंजय कुलकर्णी मिडिया वार्ता मुंबई जिल्हा प्रतिनिधी बीड तथा दैनिक नवराष्ट्र तालुका प्रतिनिधी किल्ले धारूर,अभय जोशी दैनिक पार्श्वभूमी तालुका प्रतिनिधी अंबाजोगाई,संतोष घुले, अमोल मुळे,सरपंच उमरी, मल्हारी बारगजे,चंदुलाल मिसाळ,अप्पासाहेब आंधळे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.



याप्रसंगी बोलताना भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते केज पंचायत समितीचे माजी सभापती विष्णु भाऊ घुले यांनी सांगितले की,आमचे मित्र पत्रकार चंद्रकांत पाटील यांना भारतीय जनता मजदुर संघाच्या वतीने गोरगरीब मजुर तसेच असंघटित क्षेत्रातील कामगार व त्यांच्या परिवाराला सेवा सुविधा देण्यासाठी संधी मिळाली असून त्याचा उपयोग गोरगरीब जनतेच्या कल्याणासाठी व्हावा अशी अपेक्षा व्यक्त केली. या सत्काराला उत्तर देताना पत्रकार चंद्रकांत पाटील यांनी सांगितले की, भारतीय जनता मजदुर संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री शांत प्रकाशजी जाटव साहेब, राष्ट्रीय सचिव श्री. भाऊसाहेब घोडके सर, महाराष्ट्र राज्याचे सचिव श्री.धनंजय कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली मराठवाडा पातळीवर असंघटित क्षेत्रातील कामगार तसेच छोटे व्यापारी यांच्या प्रगती साठी सदैव कार्यरत रहाणार असुन शासकीय सुविधा मिळवुन देण्या साठी सतत प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.तसेच आपण केलेला सत्कार हा पाठबळ देणारा आहे त्यामुळे सर्व मान्यवरांचे आभार व्यक्त केले.

# ७० हजारांसाठी खांडबारात ‘सक्का मित्र’च निघाला चोर!

## सीसीटीव्हीने उघड केला विश्वासघात; खत व्यावसायिकाच्या डोळ्यात पाणी

दैनिक वादळ वार्ता
**मोहसीन शेख । विसरवाडी**

विश्वास आणि मैत्रीच्या नात्याला काळीमा फासणारी एक अत्यंत धक्कादायक घटना नवापूर तालुक्यातील खांडबारा गावात उघडकीस आली आहे. वर्षभरापासून हळूहळू होणाऱ्या चोरीमुळे त्रस्त झालेल्या खत व बियाणे व्यावसायिक जितू सुरेश परदेशी यांना त्यांच्या नुकसानीचे कारण शोधल्यावर मोठा मानसिक धक्का बसला. कारण, हा चोरी करणारा दुसरा कोणी नसून त्यांचा अत्यंत जवळचा आणि विश्वासू मित्र अनिल रज्जनलाल शर्मा निघाला!



जितू परदेशी यांच्या दुकानातून गेल्या वर्षभरापासून सतत पैसे गायब होत होते, ज्यामुळे त्यांच्यावर आर्थिक नुकसान आणि कर्जाचा ताण वाढत चालला होता. ’पैसे जातात तरी कुठे?’ या संशयातून अखेर त्यांनी दुकानातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्याचा निर्णय घेतला.

फुटेज तपासताच परदेशी यांच्या पायाखालची जमीन सरकली. दुकानात संधी साधून गल्ल्यातील रक्कम चोरताना त्यांचा मित्र अनिल शर्मा स्पष्टपणे दिसून आला. या ’चोर मित्रा’ने परदेशी यांचा विश्वासघात करत अंदाजे ७० हजार रुपयांची चोरी केल्याचे बोलले जात आहे.मित्रानेच केलेल्या या विश्वासघातानंतर जितू परदेशी यांनी कोणताही विलंब न लावता विसरवाडी पोलीस ठाण्यात धाव घेऊन अनिल शर्माविरुद्ध तक्रार दाखल केली. पोलिसांनी तात्काळ कारवाई करत भादंवि कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला असून सीसीटीव्ही फुटेज आणि व्हिडिओ पुरावे जप्त केले आहेत.

या घटनेमुळे खांडबारा परिसरात मोठी खळबळ उडाली असून, सक्का मित्रच पक्का वैरी निघाला या चर्चेने परिसर ढवळून निघाला आहे. विसरवाडी पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक देविदास वडगुले पुढील तपास करत आहेत.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077